**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# डॉ. सोपानराव चव्हाण यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे

## प्रा. अनिल पाटील : वाढदिवसानिमित्त कोयना शिक्षण संस्थेमध्ये कार्यक्रम

**वार्ताहर**

पाटण

कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षण क्षेत्रात दूरगामी तसेच अत्यंत मोलाचे कार्य केले आहे. माझ्या तालुक्यातील प्रत्येक मुलाने शिकले पाहिजे आणि त्यांना शहरातील मुलांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे हीच त्यांची खरी तळमळ होती. डॉ. चव्हाण यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य दीपस्तंभाप्रमाणे असल्याचे प्रतिपादन ग्रंथपाल प्रा. अनिल पाटील यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. सोपानराव चव्हाण यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे, प्रा. दत्तात्रय थोरात, प्रा. विनायक माथने, प्रा. सतीश गायकवाड, दिनकर देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.



**पाटण : डॉ. सोपानराव चव्हाण वाढदिवस कार्यक्रमात बोलताना प्रा.अनिल पाटील. व्यासपीठावर प्र. प्राचार्य विलास कळंत्रे व मान्यवर.**

प्रा. अनिल पाटील म्हणाले, डॉ. सोपानराव चव्हाण यांनी संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. तालुक्यातील प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देताना अनेक पिढ्या घडविल्या. तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, आधुनिक संगणक शिक्षण तसेच रोजगाराभिमुख अभ्यासक्रम मिळावेत, यासाठी त्यांनी कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उभारणी केली. त्यामुळे तालुक्यातील आज हजारो विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले आहेत.

प्राचार्य डॉ विलास कळंत्रे म्हणाले, डॉ. सोपानराव चव्हाण यांनी संस्थेच्या माध्यमातून शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य प्रेरणादायी आहे.